**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत ग्रामविकास योजनांच्या तळाशी सामाजिक न्यायतत्व होते – डॉ. अमोल वाघमारे**

महाड

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ग्रामविकासांच्या योजना सामाजिक न्यायतत्त्वातून साधल्या गेल्या पाहिजेत अशी तळमळ ठेवली असे उद्‌गार डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात आयोजित सम्यक जीवनदर्शन महोत्सवातील तिसऱ्या पुष्पाप्रसंगी प्रतितयश प्राध्यापक, समाजांगी व्यासंग असणारे हरहुन्नरी डॉ. अमोल वाघमारे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी गुरव होते.

ग्रामविकासाच्या दशा व दिशा या विषयावर मत मांडताना डॉ. वाघमारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या ऐतिहासिक भूमीतील पाण्याच्या संगरचा संघर्ष स्पष्ट करीत छ. शिवाजी महाराज, म. फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या महाराष्ट्रातील अन्नदाता आत्महत्यासारख्या नैराश्यमय मार्गाचा अवलंब का करीत आहे, याची कारणमीमांसा स्पष्ट करीत गेल्या ७ वर्षात महाराष्ट्रात ६,१०० शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवनयात्रा संपविली याबद्दल खंत व्यक्त केली. डॉ. पीनाक या मासशास्त्रज्ञांचा दाखला देत ग्रामीण भागातील शेतकरी नैराश्याचा संबंध शेतीशी असून समकालीन सरकारची चुकीची धोरण, शेतकऱ्यांमधील अज्ञान, आरोग्याची हेळसांड पिकाबाबत अज्ञानता हे पटवून देत भारतातील ग्रामीण भाग खरोखरच विकसित करायचा असेल तर साक्षरता वर्गाची प्रसांगिकता स्पष्ट केली. आज ग्रामीण भागातील लोकांचे शारिरीक बरोबरच मानसिक आरोग्यही धोक्यात आले असून त्यामुळेच व्यसनाधिनता वाढत चालली आहे. हे याचा उहापोह त्यांनी केला. आज ग्रामीण भागातील शिक्षणाची सार्वत्रिकता आहे पण गुणात्मकता ढासळली आहे हे पटवून देत वाढत्या इंग्रजी माध्यमांच्या शाळेबाबतची उपरोधिकता मांडली.

ग्रामीण भागातील अशा शैक्षणिक रचनेमुळेच बरोजगारी समस्या वाढत असून दरवर्षी महाराष्ट्रातील १,६०,००० कुंटूंबे नोकरीच्या शोधात स्तलांतर करतात याबाबतच खंत व्यक्त केली. आज गावातील गटबाजीचे राजकारण, प्रशासनातील भ्रष्टाचार याबाबत परखड मते व्यक्त करीत डॉ. वाघमारे यांनी गावातील प्रत्येकाने रचानात्मक, वैचारिक संघर्ष ही त्रिसूत्रात्मक विकास कार्यक्रम आखत निर्भयता, प्रामाणिकता, याचा अवलंब करीत शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करून रायायनिक खतांऐवजी सैद्रियता आणत शेतीपूरक उद्योगांचे जाळे उभारून गावांचे नंदनवन फुलवा असे आवाहन करीत स्वातंत्र्यवीर भगतसिंगाच्या जीवनाचा दाखला दिला.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. धनाजी गुरव यांनी संपूर्ण महाडकरांच्या विकासासाठी महाविद्यालयाने उन्नत भारत अभियान सुरू केले असून ८ गावे दत्तक घेतली असून तेथील विकासाच्या व समस्या निवारण्याचा सर्वे वाढत्या शहरीकरणाबात व खेडयांच्या स्थलांतराबाबत चिंता व्यक्त करीत पुन्हा खेडयांकडे चला अशी आर्त हाक युवकांना दिली. आज पुन्हा जिल्हा परिषदेच्या शाळा उभारी घेत आहेत, त्याबाबत कौतुक करीत आज खेडयातील माणसे शहराकडे धाव न घेता ग्रामीण भागातच व्यवसायाचे स्थिरीकरण कसे करतील याचे औचित्य स्पष्ट करीत शेतकरी वर्गाने रासायनिक खताऐवजी सेंद्रिय शेतीला प्राधान्य देत लोकजीवनाचे व्रत घ्यावे अशी आर्त हाक शेतकरी पुत्रांना दिली यासाठीच प्रबोधनपर प्रत्येक गावात ग्रंथालय उभारण्याचा मानसही तयांनी व्यक्त केला., त्याचेच नेतृत्व म्हणून काथुर्डे गावात पहिले ग्रंथालय सुरू केल्याचा आनंद व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. प्रतिभा कांबळे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.